नीलिमा पवार

# कर्मयोगी बाळासाहेब वाघ



**के. के. वाघ शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष बाळासाहेब वाघ यांची ९२ वी जयंती आज, शनिवारी (दि. १९) साजरी होत आहे. त्यानिमित्त त्यांच्या जीवनप्रवासाचा घेतलेला धांडोळा...**

निमित्त

स्वातंत्र्यापूर्वीच्या काळात सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक गुलामगिरीविरुद्ध निर्भयपणे बंडाचे निशाण खांद्यावर मिरविणाऱ्या काकासाहेब वाघ यांच्या घरात रोज घडणाऱ्या स्थित्यंतराचा परिणाम सर्वांत जास्त त्यांच्या कुटुंबावर होत होता. काकासाहेबांच्या कारकिर्दीत अशोक स्तंभाजवळील हनुमान घाटावर असलेला 'वाघ बंगला' या चळवळींचे एक प्रमुख केंद्र होते. घरात थोरामोठ्यांचा सतत राबता असे तेव्हा बाळासाहेब वाघ ऊर्फ भाऊमामा हे तेथील स्वयंस्फूर्त स्वयंसेवकच असत. प्रत्यक्ष अनुभव व मिळालेल्या सहवासामुळे हे घर सुसंस्कृत झाले. त्यांची निरीक्षण व आकलनशक्ती इतकी अफाट होती, की त्यांनी अनेक चांगले संस्कार घेतले. काकांची वैचारिक श्रीमंती व बाईंची स्थितप्रज्ञता हे दोन्ही संस्कार मामांमध्ये सारखेच वाढीला लागले आणि तो आलेख त्यांच्या जीवनभर वाढतच राहिला.

सुट्टीत आम्ही पाच-पन्नास नातवंडे नाशिकला एकाच वेळी आजोळी जमायचो. त्यावेळी आम्हाला सांभाळायची जबाबदारी भाऊमामांकडेच असायची. भाऊमामांना पोहोण्याची मोठी आवड. सुट्टीत ते आम्हा सर्वांना हनुमान घाटावर पोहायला घेऊन जात. सूर्यनमस्कार घातल्याशिवाय त्यांचा दिवस सुरू होत नसायचा. एक वेगळा प्रसंग मला येथे सांगावासा वाटतो, एकेकाळी वैभवशाली असलेल्या वाघ कुटुंबाला दरम्यानच्या काळात उतरती कळा आली, तेव्हा भाऊ प्रत्यक्ष शेतीवर आले. त्यांनी स्वतःहून घराची जबाबदारी उचलली. मोठे मामा, स्वतःचे कुटुंब आणि आजीसह असणारे धाकटे मामा आणि नाशिकचे घर ही तीनही कुटुंबे त्यांनी काही काळ चालविली. त्यांनी यासंदर्भात कधीही कोणाला सांगितले नाही. हा त्यांच्या मनाचा थोरपणाच म्हणावा लागेल.

एक ध्येयवेडा माणूस म्हणून आम्ही त्यांच्याकडे पाहत आलो. त्यांना वाचनाची खूप आवड होती. त्यांनी उभारलेले कोणतेही महाविद्यालय असो तेथे पुस्तकांचा संग्रह मोठ्या प्रमाणात असतो. संस्थेच्या आवारातील प्रत्येक वीट या विश्वकर्म्याला ओळखते. मामांची राहणी खूपच साधी होती. मामा खरे तर बी. एस्सी. ॲग्री, पण त्यांचा पिंड शेतकऱ्याचा होता. म्हणजे रोज नवनिर्मितीचा आनंद घेण्याचा! वृत्ती संशोधकाची, नित्य नव्या अभ्यासाची होती. मामांनी के. के. वाघ शिक्षण संस्थेत खूप झाडे लावली. मामांना एकच व्यसन होते ते म्हणजे जे काम हातात घेतले ते जिद्दीने, काटकसरीने पूर्ण करण्याचे. कारखान्यात व संस्थेतही त्यांनी अत्यंत काटकसरीने कारभार चालवला. भाऊमामा कोणत्याही प्राचार्यांच्या खुर्चीवर कधी बसले नाहीत. अनेक तत्त्वे, बंधने त्यांनी स्वतःसाठी घातलेली होती. शिस्तीच्या बाबतीत ते शेवटपर्यंत आग्रही राहिले.


मामा-मामींचा प्रपंच-प्रवास खूपच खडतर झाला. मामा मात्र संताप्रमाणे हळूहळू सारीच जबाबदारी मामींवर सोपवून त्या संसारातून निवृत्त झाले. मामांना पक्के लक्षात आले होते, की त्यांच्या संसाराची दोरी समर्थ हाती आहे. स्त्रीशिक्षण हा मामांचा आवडीचा विषय होता. स्त्रीसंतांचा इतिहास मामा भक्तिभावाने आम्हाला सांगत असत. काकासाहेब वाघ यांनी मराठा विद्या प्रसारक समाजाचे सेक्रेटरी असताना उदोजी बोर्डिंगच्या परिसरात एक अभिनव प्रयोग दूरदृष्टीने सुरू केला होता. ज्या विद्यार्थ्याला जो व्यवसाय आवडेल, त्याचे शिक्षण त्याने घ्यावे. त्याला शिक्षणाची, वयाची अट नसावी. दुर्दैवाने हा प्रयोग फसला. पण, मामांना मात्र विद्यार्थ्यांची नस गवसली. जयंतीच्या निमित्ताने भाऊमामांची मते, मुलाखत आणि लघुपटांच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहोचविल्यास ते भावीपिढीला नक्कीच मार्गदर्शक, दिशादर्शक ठरणार आहे. मामांनी वयाची शंभरी गाठावी अशी इच्छा होती, पण नियतीने ती अपूर्णच ठेवली...

**(लेखिका 'मविप्र' नाशिकच्या माजी सरचिटणीस आहेत.)**

शिल्पकार विकासाचा...
देशदूत
नाशिक आवृत्ती
epaper.deshdoot.com
18 Oct 2024 - Page 9

# पितृतुल्य व्यक्तिमत्त्व : बाळासाहेब वाघ

**के. के. वाघ शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष व महाराष्ट्रातील विनाअनुदानित अभियांत्रिकी, तंत्रनिकेतने, कृषी व कृषी संलग्न महाविद्यालये या तीनही असोसिएशनचे संस्थापक अध्यक्ष, द्रष्टे ज्ञानयोगी यांच्या ९२ व्या जयंती निमित्त त्यांच्या आठवणींना दिलेला उजाळा...**



**भाऊ** म्हणजे आदरणीय कै. बाळासाहेब वाघ क. का. वाघ संस्थेचे सर्वेसर्वा, हजारोंचे पोशिंदा ! सहा फेब्रुवारीच्या लतादीदींच्या निर्वाणाच्या दुःखात बुडालेले असताना भाऊंची निधनाची बातमी वाचली. बधीर झालेल्या मनशुन्यतेवर आणखी किती बधीरता येणार ? शोक, आक्रंदन, वियोग या शब्दातही व्यक्त न करता येणारी भावना दाटून आली. आज मी हे लिहू शकते कारण इतके दिवस भाऊंच्या निधनाची बातमी माझ्या मनःपटलावर स्थिरावतच नव्हती असं मी त्याचं चिरतरुण व्यक्तीमत्व मी पाहिलेलं आहे. त्यामुळे ही वार्ता माझे मन स्वीकारुच शकत नव्हते. मी रोजच भाऊंना भेटत होते असेही नाही, तरीही भाऊ माझ्या मनाच्या अशा ठिकाणी होते. जिथे ईश्वर असतो. कोणीतरी आपली काळजी घेणारे आहे या विश्वासावर जसे आपण बिनधास्त जगत असतो तसे भाऊ माझ्या मनात सतत असतात, त्याची अनेक कारणे माझ्या बालपणात रुजलेली आहेत.

लहानांपासून थोरापर्यंत सगळ्यांचेच ते भाऊ होते. आमचे बालपण भाऊसाहेबनगर मध्ये गेले. माझें तर भाऊंच्या मळ्यात आणि मामीच्या सहवासात गेले. भाऊ, मामी यांच्या सोबत मला मिळालेले काही अमुल्य क्षण आठवले की मी किती भाग्यवंत आहे हे सतत जाणवत राहते. माझे शालेय शिक्षण क. का. वाघ विद्याभवन मध्ये झाले आणि प्राध्यापिका म्हणून माझी पहिली नोकरीही क. का. वाघ तंत्रनिकेतन मध्येच मिळाली.


भाऊंची निधनाची बातमी समजल्यानंतर एकेक गोष्टी डोळ्यासमोरून सरसर चालल्या होत्या. बाळकडू कसे मिळते त्यावर आपल्या भवितव्यातल्या वाटचाली ठरतात असे म्हणतात ते काही उगीच नाही. के. के. वाघ विद्याभवन व पुढे के. के. वाघ तंत्रनिकेतन तिथल्या मातीने मला बौद्धिक सुगंध दिला. जेवढे दिवस मी के. के. वाघ पालीटेक्निक मध्ये होते त्यातले कित्येक वेळा भाऊंबरोबर भाऊसाहेब नगर ते कॉलेज त्यांच्या सोबत येण्याचे भाग्य आणि सन्मान मला मिळाला.

वाघ परिवाराचे माझ्यावर फार ऋण आहेत ते मी फेडू शकणार नाही. त्या ऋणातच राहुन सतत चांगलं कार्य करत राहण्याचे आश्वासन नक्की देईन, कारण ते त्यांच्याकडूनच मिळालेले देणे आहे. असा परिस स्पर्श आपल्या आयुष्यास नकळतपणे लाभतो आणि त्यांच्या तेजाच्या खुणा आपल्या व्यक्तीमत्वात दिसायला लागतात. तिथे मी शिकले मालक आणि कर्मचारी यांचे नाते कसे असावे, भाऊंनी, मामींनी, समीरदादा, अजिंक्य, मंजुदीदी सगळ्यांनी के. के. वाघच्या सर्व विद्यार्थी, मुख्याध्यापक वृंद, कर्मचारी, शिक्षकांवर भरभरून प्रेम केले. माझ्या या आठवणींतून त्यांची काम करण्याची पद्धत म्हणजे कुठे व्यावसायिकता दाखवायची आणि कुठे प्रेम हे आपल्याला समजु शकते. त्यांचे माझ्यावर एवढे प्रेम असण्याचे मूळ कारण त्यांचे माझ्या आई-वडिलांवर असलेले प्रेम! मी अनुभवलेले त्यांच्या स्वभावाचे दोन पैलू: एक म्हणजे कडक प्रशासकीय अधिकारी आणि दुसरे प्रेमळ पितृतुल्य माणूस! श्रीफळा प्रमाणे बाहेरून कडक आणि आतमध्ये अमृत ! ध्येयाचा ध्यास घेतलेले, धुरंदर, दूरदृष्टी असलेले, सतत कार्यमग्न, संतस्थ वृत्तीचे भाऊ त्यांच्या बद्दल माझ्यासारखी लहान व्यक्ती त्यांच्या भव्यतेबद्दल कशी लिहू शकते? ती भव्यता पाहून मी फक्त दिपून जाते. भाऊ आपल्याला सोडून जाऊ शकत नाहीत ते देहातीत गुरु बनून सतत आपल्या सोबत राहतील. आपल्यासंकटात आपल्याला त्यांचा आधाराचा हात देतील. भाऊंना विनम्र आदरांजली.....!

**–विजयालक्ष्मी मणेरीकर (लक्ष्मीमंगेश)**

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

# माझ्या ओळखीतले बाळासाहेब वाघ



**कर्मवीर बाळासाहेब वाघ यांची शनिवारी (दि.१९) ९२ वी जयंती साजरी होत आहे. यानिमित्ताने त्यांच्या जीवनकार्यावर टाकलेला प्रकाशझोत.**

कै. बाळासाहेबांचा व माझा संबंध तसा अलीकडचा. जानेवारी १९९६ मध्ये महाराष्ट्र शासनाने पाण्याच्या संदर्भात केलेल्या कामगिरीचा आढावा घेऊन भविष्याची पुनर्बांधणी करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र जल व सिंचन आयोगाची स्थापना केली. या आयोगाचे अध्यक्ष म्हणून डॉ. माधवराव चितळे यांची निवड केली गेली. या आयोगात सचिव म्हणून काम करण्याची मला संधी मिळाली. याच आयोगावर कै. बाळासाहेब वाघ यांची सदस्य म्हणून निवड करण्यात आली होती. चार-साडेचार वर्षांच्या या कालावधीत कै. बाळासाहेबांचा सहवास लाभला व त्यातून स्नेह व आपलेपणा निर्माण झाला.

पुणे येथील कृषी महाविद्यालयात त्यांचे शिक्षण पूर्ण झाले. १९५०-५५ च्या दरम्यान त्यांनी कृषी शास्त्राची पदवी धारण केली असावी. त्यावेळची शिक्षण गुणवत्ता पाहता त्यांनी घेतलेल्या त्या काळाची बी. एस्सी (कृषी) पदवी आत्ताच्या डॉक्टरेट या पदवीच्याही पुढे जाते. पांढरा पायजमा, घोळ नेहरू शर्ट व डोक्यावर पांढरी गांधी टोपी, पायात कातडी चपला असा त्यांचा पोषाख मी त्यांच्याशी ओळख झाल्यापासून पाहत होतो. त्यांच्या वागणुकीत कसलाही कृत्रिमपणा नव्हता. राजकारणापासून चार पावले दूर राहण्याचा त्यांचा स्वभाव.

नाशिक येथील आग्रा रोडवरील कर्मवीर काकासाहेब वाघ शिक्षण संस्थेची उभारणी, येथील वैभव त्यांच्या कार्याची साक्ष देते. या ठिकाणी बाळासाहेबांचे कार्यालयवजा घर होते. दररोज रात्री नऊ वाजता ते निफाडजवळील भाऊसाहेबनगर येथे राहत्या घरी मुक्कामाला जात असत. कधीही सुटी नाही, आळस नाही. एखाद्या गुणी विद्यार्थ्याप्रमाणे ते रात्री नऊपर्यंत वयाच्या ९० वर्षांपर्यंत संस्थेच्या कामात मग्न असलेले मी पाहत आलो. या शिक्षण संस्थेचा आज वटवृक्ष झालेला आपण पाहत आहोत. अभियांत्रिकी, कृषी व इतर आनुषंगिक विषयाला वाहून घेतलेल्या शाळा, महाविद्यालये संस्थेमार्फत चालविल्या जातात.

महाराष्ट्रात गेल्या वीस वर्षांच्या काळात खासगी क्षेत्राने शिक्षणाला आपल्या विळख्यात घेतले आहे. अभियांत्रिकी, वैद्यकीय, व्यवस्थापन, संगणक, इत्यादी शाखेमध्ये उच्च पदवीधारक निर्माण करण्यासाठी खासगी व्यवस्था पुढे आली आहे. यातून आपण गुणवान व बुद्धिमान पिढी निर्माण करू शकू का याचे उत्तर काळच देणार आहे. या पिढीच्या निर्मितीसाठी तितक्याच मोठ्या संख्येने निष्णात, उच्चविद्याविभूषित आणि अनुभवी शिक्षकांची, प्राध्यापकांची फळी उभी करावी लागणार आहे, हे नजरेआड करून चालणार नाही. ज्यांनी हे वेळीच ओळखले ते तरतील व जे हे ओळखण्यात कमी पडतील ते काळाच्या ओघात संपतील. असे होऊ नये म्हणून बाळासाहेबांची धडपड वाखाणण्यासारखी होती. त्यांच्या संस्थेतील शिक्षक, प्राध्यापक वृंद हा उच्च शिक्षण घेतलेला, हुशार गुणवान होण्यासाठी, तसेच त्याला घडविण्यासाठी सातत्याने ते प्रयत्न करीत राहिले. इतर संस्थांनी अनुकरण करावे असे उपक्रम ते नेहमीच राबवत आले.

ग्रामीण भागावर त्यांचे विशेष प्रेम होते. मुलींनी शिकले पाहिजे. पदवीधर, पदव्युत्तर झालं पाहिजे म्हणजे त्यांना शिकलेले नवरे मिळतील, पुढची पिढी चांगली निर्माण होईल अशा तऱ्हेने ग्रामीण भागाचे सबलीकरण होईल, यावर त्यांचा विश्वास होता. यात ग्रामीण मुलींनी मागे पडावयास नको म्हणून शैक्षणिक संस्थांनी मुलींना शिक्षण देण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या सुविधा पुरविल्या पाहिजे, याबद्दल ते आग्रहाने भूमिका मांडत असत. शंभर शिकणाऱ्या मुलातून दहाएक मुले महाविद्यालयात जातात. त्यापैकी ४ विज्ञान शाखेकडे वळतात आणि उर्वरित बहुतांश कला शाखेकडे जातात. येणारे युग हे विज्ञानाचे युग आहे. ज्ञानाचे युग आहे. ४ मुले देशाची, समाजाची गरज कशा प्रकारे भागवतील, यावर गांभीयनि विचार करावयास पाहिजे, असे ते म्हणत असत. ग्रामीण भागाचा विकास पाण्याशी जोडलेला आहे. या पाण्याचे संधारण करण्यासाठी शेतकऱ्यांनी, कृषी उद्योगांनी शक्ती पणाला लावली पाहिजे आणि पाण्याचे शेतीच्या माध्यमातून संपत्तीत रूपांतरण करण्याचं कसब अंगी आणलं पाहिजे, हा विचार ते कृतीत आणण्याचा प्रयत्न करीत असत. ग्रामीण भागाचा विकास झाला पाहिजे यासाठी लोकचळवळ निर्माण झाली पाहिजे. लोकांचे शिक्षण झाले पाहिजे. रिकाम्यापोटी करमणूक ही अनाठायी वाटते आणि असे होऊ नये म्हणून साहित्य परिषदेच्या धर्तीवर सिंचन परिषदा मोठ्या स्वरूपात घडवून आणण्यात त्यांनी हिरिरीने भाग घेतला, सहकार्य केले, आर्थिक मदत केली. जानेवारी २००६ ची नाशिक येथील सिंचन परिषद हे त्याचेच फलित आहे, असे ठामपणे सांगावेसे वाटते.

**- डॉ. दि. मा. मोरे, पुणे**

दैनिक लोकनामा
नाशिक, शुक्रवार, १८ ऑक्टोबर २०२४
www.eloknama.com

# (कै.) बाळासाहेब वाघ गुरू महाराव

तव प्रतिभेचे रंग किती तू मज दाखवले
साक्षात्कार, विभावन, अनुभूती, दृष्टांत
असे सगळे एकाच जन्मी मज लाभले
तुका म्हणे ज्ञानियांचा राजा गुरू महाराव लाभला
तव हृदयी त्यांचे प्रतिबिंबाचा ठाव सदैव
जपेन मी हा अमृततुल्य दुर्लभ भाव

भाऊ म्हणजे आदरणीय बाळासाहेब वाघ! क. का. वाघ संस्थेचे सर्वेसर्वा, हजारोंचे पोशिंदा!! सहा फेब्रुवारीच्या लतादीदींच्या निर्वाणाच्या दुःखात बुडालेले असताना भाऊंच्या निधनाची बातमी वाचली. बधिर झालेल्या मनशून्यतेवर आणखी किती बधिरता येणार? शोक, आक्रंदन, वियोग या शब्दांतही व्यक्त न करता येणारी भावना दाटून आली. मी रोजच भाऊंना भेटत होते असेही नाही, तरीही भाऊ माझ्या मनाच्या अशा ठिकाणी होते जिथे ईश्वर असतो. लहानांपासून थोरांपर्यंत सगळ्यांचेच ते 'भाऊ' होते.

आमचे बालपण भाऊसाहेबनगरमध्ये गेले. माझं तर भाऊंच्या मळ्यात आणि मामीच्या सहवासात गेलं. माझे शालेय शिक्षण क. का. वाघ विद्याभवनमध्ये झाले आणि प्राध्यापिका म्हणून माझी पहिली नोकरीही क. का. वाघ तंत्रनिकेतनमध्येच मिळाली. मी पाचवीत गेले आणि आमच्या शाळेच्या परिसरात अधूनमधून अशी एक व्यक्ती मला अनेक लोकांच्या गर्दीतून वेगळी भासू लागली. कारण त्या व्यक्तीचा वेश, दिसणं, हसणं, सगळं निखळ होतं. जसजशी मोठी होत गेले तसतसे कळायला लागले ही फार महत्त्वाची व्यक्ती आहे. पण संस्थेची मालक वगैरे कळण्याचे ते वय नव्हते. मग मधली काही वर्षे शिकण्यासाठी बाहेरगावी गेले आणि वाघ कुटुंबाशी माझा संपर्क तुटला. माझे पुणे विद्यापीठातले शिक्षण संपले.

भाऊंच्या निधनाची बातमी समजल्यानंतर एकेक गोष्टी डोळ्यासमोरून सरसर चालल्या होत्या.



बाळकडू कसे मिळते त्यावर आपल्या भवितव्यातल्या वाटचाली ठरतात असे म्हणतात ते काही उगीच नाही. के. के. वाघ विद्याभवन व पुढे के. के. वाघ तंत्रनिकेतन, तिथल्या मातीने मला बौद्धिक सुगंध दिला. आपण काय आहोत हे आपल्यापेक्षा आपल्याला लहानपणापासून घडवणारेच जास्त जाणून असतात. जेवढे दिवस मी के. के. वाघ पॉलिटेक्निकमध्ये होते त्यातले कित्येक वेळा भाऊंबरोबर भाऊसाहेबनगर ते कॉलेज त्यांच्यासोबत येण्याचे भाग्य आणि सन्मान मला मिळाला. याला साक्षात ईश्वर सहवास म्हटले तरी अतिशयोक्ती ठरणार नाही. कारण माझ्या मनात त्यांची प्रतिमा तशीच आहे. के. के. वाघच्या नोकरीत असताना मला नियोजित पाठ्यक्रमाबाहेर जाऊन उपक्रम राबवण्याची फार आवड होती. मी फार महत्त्वाकांक्षी असल्यामुळे मला के. के. वाघ सोडून दुसरीकडे जायचे होते. मग मी भाऊंना भेटायला गेले. मी काहीच बोलू शकत नव्हते. त्यांच्यासमोर मी फक्त हट्टी लहान बाळ रडते तसे रडत होते. मी भाऊंना सांगितले, "भाऊ मी जन्माला आल्यापासून आत्तापर्यंत के. के. वाघच्या कुशीतच जगले आहे. मला बाहेर जाऊन जग पाहायचे आहे." तर मला म्हणाले, "जाऊन 'ये'". त्यांनी मला कधीही अडवले नाही, पण त्यांच्या शेवटच्या शब्दांत 'ये' होता!

विजयालक्ष्मी मणेरीकर
९८२२६८३७९९

त्यावेळी मला इतर प्राध्यापकांनी तसेच प्राचार्यांनी समजावले की, मॅडम एकदा हा कॅम्पस सोडला की, के. के. वाघ पुन्हा परत घेत नाही, पण मी कोणाचेही काही ऐकले नाही. नोकरी सोडली. कारण डोक्यात भाऊंचा 'ये' होता. एक वर्षानंतर मला प्रा. मंजूश्री राजोळे यांच्याकडून निरोप मिळाला, विजू तू परत के. के. वाघ ज्वाइन कर. मी त्यांना सांगितले, आता मला शक्य नाही, तर त्या म्हणाल्या, मग व्हिजिटिंग फॅकल्टी म्हणून ये. रविवारीही चालेल! मला फारच आश्चर्य वाटले. मी सलग दोन वर्षे 'वुमन्स पॉलिटेक्निक'साठी रविवारी लेक्चर्स घेतली आहेत.

आम्ही स्वतःची शाळा सुरू केल्यानंतर मी एकदा भाऊंना भेटायला गेले. तर मला म्हणाले, "फार ऐकतोय मी तुझ्या शाळेबद्दल." मी म्हटले, "भाऊ सगळे तुमचंच देणं आहे. जे के. के. वाघ विद्याभवनने ज्ञानाचं दान मला दिलं तेच मी माझ्या शाळेत रुजवतेय, माझ्या जगण्यात, वागण्यात के. के. वाघचेच संस्कार आहेत. तुम्हीच रुजवलेलं रोपटं आहे." तर म्हणाले, "तुला खरंच असं वाटतं?" मी म्हणाले, "असं का विचारता भाऊ? तुमच्या दूरदृष्टीशिवाय ही संस्था चालली असती का? तुमच्या आधाराशिवाय आमच्या सारखे विद्यार्थी घडले असते का? असे हजारो विद्यार्थी तुम्ही घडवले, तेही निष्काम कर्मयोग्याप्रमाणे, तुम्हीच आम्हाला हा कर्मयोग शिकवला. तुम्ही प्रत्यक्ष कधी वर्गात जाऊन शिकवले नसले तरी तुम्हीच आमच्या सारख्या विद्यार्थ्यांचे महागुरू आहात." वाघ परिवाराचे माझ्यावर फार ऋण आहेत. ते मी फेडू शकणार नाही. प्राक्तनाच्या गर्भात असे काहीतरी पडत असते. त्याच्या पाऊलखुणा आपण मागे वळून पाहतो तेंव्हाच दिसतात. मग आपणच अवाक् होतो की, आपल्या सोबत काही काळ ही दैवी पावले आपल्या भाग्यात होती. म्हणून आपण वेगळ्या वाटेवर चालण्याची हिंमत धरली आणि त्या वेगळ्या वाटेवर तग धरून चालत राहिलो आणि समाजात काही योगदान देण्यायोग्य झालो. असा परिसस्पर्श आपल्या आयुष्यास नकळतपणे लाभतो आणि त्याच्या तेजाच्या खुणा आपल्या व्यक्तिमत्त्वात दिसायला लागतात.

माझा हा लेख जिव्हाळ्याचा आहे. त्यामुळे यात त्यांच्या व्यावसायिक उंचीचे दाखले आलेले नाहीत ते इतरांच्या लेखात असतीलच. परंतु माझ्या या आठवणींतून त्यांची काम करण्याची पद्धत म्हणजे कुठे व्यावसायिकता दाखवायची आणि कुठे प्रेम हे आपल्याला समजू शकते. त्यांचे माझ्यावर एवढे प्रेम असण्याचे मूळ कारण त्यांचे माझ्या आई-वडिलांवर असलेले प्रेम! मामींनी तर माझ्या आईवर फारच प्रेम केले ते शब्दातीत आहे.

भाऊंनी माझ्या वडिलांवर केवळ एक शिक्षक म्हणून नव्हे, तर एक कलाकार म्हणून प्रेम केले. मला वाटते, ज्या क्षणी आपल्याला प्रेम ओळखता येते तिथून पुढचा आयुष्याचा प्रवास वेगळे वळण घेतो आणि व्यक्ती म्हणून आपण बदलत जातो. मी अनुभवलेले त्यांच्या स्वभावाचे दोन पैलू : एक म्हणजे कडक प्रशासकीय अधिकारी आणि दुसरे प्रेमळ पितृतुल्य माणूस! श्रीफळाप्रमाणे बाहेरून कडक आणि आतमध्ये अमृत! ध्येयाचा ध्यास घेतलेले, धुरंदर, दूरदृष्टी असलेले, सतत कार्यमग्न, संतस्थ वृत्तीचे भाऊ, त्यांच्याबद्दल माझ्यासारखी लहान व्यक्ती त्यांच्या भव्यतेबद्दल कशी लिहू शकते? ती भव्यता पाहून मी फक्त दीपून जाते. भाऊ आपल्याला सोडून जाऊ शकत नाहीत. ते देहातीत गुरू बनून सतत आपल्या सोबत राहतील. आपल्यावरील संकटात आपल्याला त्यांचा आधाराचा हात देतील.

**भाऊंना विनम्र आदरांजली!**

दैनिक
लोकनामा

# विद्यार्थ्यांच्या जिज्ञासेला वाव देण्याची गरज

## ज्येष्ठ पत्रकार कुबेर : कर्मधुरंधर कै. बाळासाहेब वाघ जयंतीदिनी व्याख्यान

लोकनामा प्रतिनिधी

**नाशिक** : भारतीय शिक्षण संस्थांमध्ये मूलभूत सुविधांची मुबलकता दिसत असली, तरी विद्यार्थ्यांच्या जिज्ञासेला वाव देण्याची मोठी गरज आहे. विद्यार्थ्यांनी प्रश्न विचारले पाहिजेत आणि त्यांच्या प्रश्नांना योग्य उत्तरे मिळाली पाहिजेत. परंतु मुलांची विचार क्षमताच नष्ट करण्याचा प्रयत्न होत असल्याने पाश्चात्य किंवा परदेशी विद्यार्थ्यांपेक्षा भारतीय विद्यार्थी हे विज्ञान, तंत्रज्ञानासह अनेक शैक्षणिक क्षेत्रात अद्यापही मागे असल्याचे खेदाने नमूद करावे लागते, असे मत ज्येष्ठ विचारवंत, पत्रकार गिरीश कुबेर यांनी व्यक्त केले.

के. के. वाघ शिक्षण संस्था, स्माईल व स्पिनॅच संस्था आणि बाळासाहेब वाघ वेल्फेअर फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने के. के. वाघ शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष कै. बाळासाहेब वाघ यांची ९२ वी जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी कुबेर बोलत होते. प्रमुख पाहुणे प्रसिद्ध सनदी लेखापाल प्रकाश पाठक उपस्थित होते. माजी प्राचार्य व न्यायमूर्ती रानडे संस्थेचे अध्यक्ष विश्वनाथ व्यवहारे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.




व्यवहारे यांनी अध्यक्षीय मनोगतात बाळासाहेबांच्या कार्याचा गौरव केला. यावेळी ज्येष्ठ संगणक तज्ज्ञ विजय भटकर यांनी भाऊंच्या जयंतीनिमित्त संदेश पाठविला होता. त्याचे डॉ. विलास पाटील यांनी वाचन केले.

दीपप्रज्वलन, संस्था गीत व भाऊंच्या जीवनावरील चित्रफितीने कार्यक्रमाची सुरुवात झाली. डॉ. के. एन. नांदुरकर यांनी प्रास्ताविकात भाऊंच्या जीवनप्रवासाचा आढावा घेतला. भाऊंचे सहकार व शिक्षण क्षेत्रांतील कार्य, भाऊंची दूरदृष्टी व शिक्षण क्षेत्राबद्दलच्या तळमळीने त्यांनी या क्षेत्रात केलेले बदल व त्यामुळे समाजाची झालेली प्रगती यांवर त्यांनी प्रकाश टाकला. सर्व मान्यवरांचा परिचय करून देण्यात आला व त्यानंतर संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ यांच्या हस्ते सर्व मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. अजिंक्य वाघ यांनी आभार मानले.

### 'कार्यमग्नता जीवन व्हावे'

प्रकाश पाठक यांनी, विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी आपल्यामध्ये नेहमीच जिज्ञासा प्रज्वलित ठेवली पाहिजे,प्रश्न विचारणारे विद्यार्थी व त्यांच्या शंकांचे निरसन करण्याची कुवत असणारे शिक्षक अशा पद्धतीचे वातावरण भाऊंनी या शिक्षण संस्थेत तयार केलेले आहे, असे त्यांनी म्हटले. सन्मानाने जगण्यासाठी सतत कष्ट घेण्याची तयारी सर्वांनी दाखवली पाहिजे.भाऊ सतत कष्ट घेत राहिले. नावापासून व प्रसिद्धीपासून दूर राहिले म्हणून त्यांच्या हातून हे महान कार्य घडू शकले. 'कार्यमग्नता जीवन व्हावे' अशा शब्दांत त्यांनी भाऊंचा गौरव केला. टॅलेंट टेक्नॉलॉजी व टॉलरन्स या त्रिसूत्रीनुसार सर्वांनी काम करावे. भाऊंचा वारसा पुढे चालवावा, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमास खासदार भास्कर भगरे, खासदार शोभा बच्छाव, खासदार राजाभाऊ वाजे, आमदार सीमा हिरे, आमदार माणिकराव कोकाटे, माजी आमदार सुधीर तांबे, संस्थेच्या विश्वस्त शकुंतलाताई वाघ, धनंजय माने, सुधीर मुतालिक, अनिल नेहरे, चांगदेवराव होळकर, नानासाहेब बोरस्ते, अरविंद कारे, अमृता पवार, डी. बी. काळे, हिरामण आहेर, विलास टर्ले, तुकाराम बोराडे, राजाभाऊ शेलार, संजय होळकर, नितीन कोल्हे, विजय रसाळ, कोंडाजी मामा आव्हाड, जगन पाटील, सी. आर. पाटील, तुषार सोनवणे, सुरेश हेमाडे, लक्ष्मण सावजी, रुची कुंभारकर, विजय पाटील, नीलिमा पवार आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवर, संस्थेतील सर्व प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी उपस्थित होते.